# वर आणि शाप

महाकवी वाल्मीकीच्या रामायणात कैकेयी मंथरेच्या आहारी जाऊन दशरथाकडून पूर्वी दिलेले दोन वर मागून घेते तो प्रसंग किती नाट्यपूर्ण आहे ? श्रीरामाला राज्याभिषेक होणार म्हणून सारी अयोध्यानगरी आनंदोत्सव साजरा करीत होती. आपल्या वर्तनाने आणि स्वभावगुणांनी साऱ्यांचा लाडका असलेला हा राजपुत्र, त्यावेळी मतदानाची पद्धत असती तर एकमताने निवडला गेला असता. एका रात्रीत केवढा बदल झाला. सिंहासनावर अधिष्ठित होण्याऐवजी राम-लक्ष्मण-सीता ही सारी राजवस्त्रे उतरून ठेवून वल्कले धारण करून वनवासाला निघाली. राजघराण्यातील सर्वांनाच नव्हे, तर संपूर्ण राज्यातल्या नागरिकांनाच केवढा धक्का बसला. पित्याने दिलेले वचन पाळण्यासाठी आदर्श राजपुत्र साऱ्या सुखांवर, सत्तेवर पाणी सोडून वनवासात गेला.

वर देणारे खास शक्ती असलेले लोकच असत. देवही तपश्चर्येवर प्रसन्न होऊन वर देत असत. नचिकेत्याने तीन वर मागितले. त्यातले पहिले दोन यमराजाने ताबडतोब देऊन टाकले. तिसरा वर देताना खळखळ केली. कारण तो वर म्हणजे आपली सत्ताच त्याला बहाल केल्यासारखं होतं. आधीच कबूल केले असल्याने नचिकेत्याचा दृढनिश्चय पाहून तिसरा आत्मज्ञानाचा वरसुद्धा त्याला द्यावा लागला.

थोडक्यात, वर म्हणजे कोरा चेक होता. देणाऱ्याच्या खात्यात तेवढी पुण्याई असणे आवश्यक होते आणि एकदा उच्चारलेले वचन पाळण्याची दानतसुद्धा असणे आवश्यकच. दिलेले वचन पाळण्याची देवादिकांचीच नव्हे,

तर सत्ताधाऱ्यांचीसुद्धा पद्धत होती. प्राण गेला तरी वचनभंग होणार नाही, असे आपल्या वागण्याने पटवून देणारे सत्तेवर असत.

शाप देण्यामध्ये ज्याला तो दिला जाई, त्याचे अनिष्ट होत असे. देणाराच्याही तपाचे सामर्थ्य कमी होत असे, तरीही दुर्वासांसारखे कोपिष्ट ऋषी आपली शक्ती शाप देण्यात खर्च करीत.

श्रावणाच्या अंध माता-पित्यांनी दिलेला पुत्रवियोगाचा शाप दशरथाच्या आयुष्यात आनंदाचे क्षण देऊन गेला. कारण त्यामुळेच त्याला पुत्रप्राप्ती झाली. पण रामचंद्रासारखा अतुलनीय पुत्रच आपल्या वियोगाचे सहन न होण्यासारखे दुःख त्याला देऊन त्याच्या मृत्यूला कारणीभूत ठरला. म्हणजे अन्यायाचे बळी ठरणाऱ्यांचा शापसुद्धा प्रत्यक्षात आला.

सुख, सत्ता आणि संपत्ती यांचा अधाशीपणे उपभोग घेणारे, इतरांवर अन्याय-जुलूम करणारे, आपल्याच स्वार्थासाठी इतरांचा खुशाल बळी देणारे ते राक्षस आणि असं होऊ नये यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करणारे व त्यासाठी त्याग करू शकणारे ते देव. माणूस म्हणजे या दोन प्रवृत्तींची सरमिसळ आहे. राक्षस व्हायला प्रयत्न करावाच लागत नाही. प्रलोभनांना बळी पडत गेलं तर ते आपोआपच होतं. पण देव बनण्यासाठी मात्र तप, साधना आणि त्याग यांची न टाळता येण्यासारखी गरज असते.

वर देण्यासाठी सिंहासनाची किंवा मंत्रिपदाची खुर्चीच असायला हवी, असे नाही. तुमच्या मेहनतीने किंवा सहज मिळालेली जी म्हणून सत्ता असते ती वर देण्यासाठी, वचन पाळण्यासाठी वापरायची असते. ज्यांचं भलं करता येईल ते न करता भलतंच करीत राहिलं, तर त्यांचा तळतळाट शापच बनतो. मग तप आणि साधना न करण्याने जे काटे आपण मार्गात येऊ दिले नाहीत, असं वाटत असतं तसेच काटे सगळीकडे पसरले जातात. क्षणभंगुर सुखासाठी असं होऊ द्यायचं ?

---

**– भीष्मराज बाम**

**('मना सज्जना' या पुस्तकातून)**